**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक- रानिआ / ग्रापनि / २००७ / प्र.क्र. २० /का.८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
दिनांक १३/११/२००७

## *आदेश*

ज्याअर्थी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम व त्या अंतर्गत मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ च्या तरतुदीनुसार ग्रामपंचायतीच्या प्रत्येक प्रभागातून कमीत कमी २ व जास्तीत जास्त ३ सदस्य निवडून दिले जातील अशी तरतूद असल्याने तसेच निवडणूक नियम ८ (३) मध्ये एकाच व्यक्तीला अशा सर्व प्रभागातील किंवा कोणत्याही प्रभागातील निवडणुकीस उभे रहाण्याचा अधिकार असेल अशी तरतूद असल्याने कोणतीही व्यक्ती एकाचवेळी वेगवेगळ्या प्रभागातून वेगवेगळ्या वर्गवारीच्या एकापेक्षा अनेक पदांवर निवडणूक लढवू शकते. मात्र एकाच व्यक्तीस एकाच प्रभागातील आरक्षणाच्या वेगवेगळ्या वर्गवारीतून किंवा वेगवेगळ्या पदांची निवडणूक लढविता येईल किंवा कसे याबाबत अधिनियमात किंवा नियमात कोणतीही स्पष्ट तरतूद नसल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने घटनेच्या अनुच्छेद २४३ के अन्वये प्राप्त अधिकाराचा व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १० अ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन दि. २१/८/२००७ रोजी ग्रामपंचायत निवडणुका मुक्त, निर्भय वातावरणात व निःपक्षपातीपणे पार पाडण्याकरिता "ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये गावातील दोन किंवा अधिक प्रभागांसाठी एकाचवेळी निवडणूक घेण्यात येईल, तेव्हा कोणत्याही व्यक्तीस एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक वर्गवारीतून तसेच एकापेक्षा अधिक पदांकरीता निवडणूक लढविता येणार नाही " असे आदेश पारीत केले आहेत. त्याचप्रमाणे सर्व जिल्हाधिकारी यांना निर्गमित केलेल्या पत्रान्वये एखाद्या उमेदवाराने एकाच ग्रामपंचायतीच्या एखादया प्रभागातून एकापेक्षा अधिक वर्गवारीतून नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास त्याचे प्रथम दाखल केलेले

नामनिर्देशनपत्र वैध ठरेल व त्यानंतर दुसऱ्या वर्गवारीतून दाखल केलेले नामनिर्देशनपत्र अवैध ठरेल अशा सूचना निर्गमित केल्या आहेत

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या या आदेशानुसार व याबाबतच्या पत्रानुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने घेतलेल्या निर्णयास मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर रिट याचिका ५६६४/२००७ द्वारे आव्हान देण्यात आले होते. याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. १०/१०/२००७ च्या आदेशान्वये राज्य निवडणूक आयोगाचे आदेश विधीग्राह्य असल्याचा निर्णय दिला आहे. त्याचप्रमाणे एखादी व्यक्ती एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक पदांची निवडणूक लढवू शकते किंवा कसे या मुद्यावर नियमात कोणतीही स्पष्ट तरतुद नसल्याने राज्य निवडणूक आयोगाने मुक्त व स्वतंत्र निवडणूक घेण्याच्यादृष्टीने पारित केलेले आदेश / सूचना या विधीग्राह्य आहेत असे मत व्यक्त केले आहे. मात्र नैसर्गिक न्यायाच्यादृष्टीने सदर आदेशामध्ये, राज्य निवडणूक आयोगाने काही बदल करावेत असे मा. उच्च न्यायालयाने सुचविले आहे. त्यानुसार नामनिर्देशनपत्राची छाननी सुरु करण्यापूर्वी उमेदवाराला त्याचे कोणते नामनिर्देशनपत्र तो मागे घेऊ इच्छितो व कोणत्या नामनिर्देशनपत्राची छाननी व्हावी अशी त्याची इच्छा आहे अशी विचारणा करावी. तसेच अशा व्यक्तीने / उमेदवाराने याबाबत प्रतिसाद न दिल्यास व छाननीपूर्वी असा पर्याय न स्विकारल्यास राज्य निवडणूक आयोगाने (निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने) निर्णय घ्यावा असे सुचविले आहे याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या मते उमेदवाराने असा प्रतिसाद न दिल्यास त्याबाबतीत नामनिर्देशनाच्या मुदतीत सादर केलेल्या नामनिर्देशनपत्रांपैकी पहिले किंवा त्यानंतरचे किंवा शेवटचे नामनिर्देशनपत्र छाननीसाठी घ्यावे किंवा कसे याचादेखिल आयोगाने विचार करावा अशा सूचना केल्या आहेत.

याबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २१/८/२००७ च्या आदेशामध्ये सदर आदेश निर्गमित करणे का आवश्यक आहे याची भुमिका विषद केली आहे. त्यानुसार एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक पदांकरीता किंवा वर्गवारीकरीता नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास पहिले

नामनिर्देशनपत्र वैध ठरेल व त्यानंतर दुसऱ्या वर्गवारीतून/दुसऱ्या पदाकरिता दाखल केलेले नामनिर्देशपत्र अवैध ठरेल असे निश्चित केले आहे.

आणि ज्याअर्थी, आयोगाची भुमिका व मा. उच्च न्यायालयाने दि. १०/१०/२००७ च्या उपरोल्लेखित निकालपत्रामध्ये सुचविलेली कार्यवाही याचा साकल्याने विचार करता असे आढळते की, उमेदवार एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक वर्गवारीतून किंवा एकापेक्षा अधिक पदांकरीता नामनिर्देशनपत्रे दाखल करतात त्यामागे बहुतेकवेळी जातीचे प्रमाणपत्र किंवा वैधता प्रमाणपत्र किंवा नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाची इतर कागदपत्रे यांची पूर्तता करण्यास उमेदवार नामनिर्देशनपत्र सादर करण्याचेवेळी असमर्थ असणे हे प्रमुख कारण असते. एका प्रभागात एकापेक्षा अधिक वर्गवारीतून किंवा एकापेक्षा अधिक पदांकरीता नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याची सुविधा असल्यास त्याचा जास्तीत जास्त फायदा हा आरक्षित (अ.जा., अ.ज., ना.मा.प्र.) वर्गवारीला आणि स्त्रियांना होण्याची शक्यता जास्त असते. अशी व्यक्ती आरक्षित वर्गवारीच्या पदावर तसेच अराखीव / अनारक्षित पदावरदेखील निवडणूक लढवू शकते. तसेच आरक्षित वर्गवारीच्या उमेदवाराकडे जातीचे प्रमाणपत्र किंवा वैधता प्रमाणपत्र नसल्यास सर्वसाधारण अराखीव पदाकरिता प्रथम नामनिर्देशनपत्र दाखल करुन शेवटच्याक्षणी जात पडताळणी समितीकडे वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज करुन त्या पावतीच्याआधारे राखीव पदावर नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची शक्यता असते. राज्य निवडणूक आयोगाने दि. २१/८/२००७ रोजी निर्गमित केलेल्या आदेशामागे, उमेदवाराने एकापेक्षा अधिक पदावर उदा. आरक्षित व अनारक्षित पदांवर, नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास आणि त्याची अशी दोन किंवा अधिक नामनिर्देशनपत्रे वेगवेगळया पदांकरिता वैध ठरल्यास एकच व्यक्ती एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक आरक्षित आणि अनारक्षित पदांवर निवडून येण्याची शक्यता निर्माण होते याचा विचार केला आहे. तसेच ग्रामपंचायत निवडणुकांसाठी आरक्षणाच्या वेगवेगळया वर्गवारीसाठी वेगवेगळया रंगाच्या मतपत्रिका असल्यातरी अशा सर्व पदांकरिता एकाचवेळी निवडणूक होत असल्याने मतदारास मतदानाच्यावेळी संभ्रम निर्माण होण्याची शक्यता निर्माण

होते. या गोष्टीचाही आयोगाने विचार केला आहे. आणि अशाप्रकारे मतदारांना संभ्रम निर्माण होऊ नये म्हणून दि. २१/८/२००७ च्या आदेशाद्वारे कोणत्याही व्यक्तीस एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक पदांकरिता निवडणूक लढविता येणार नाही असे आदेश निर्गमित केले आहेत. त्याचप्रमाणे अशाप्रकारे मर्यादा न घातल्यास आणि एखादी व्यक्ती एकापेक्षा अधिक पदांवर निवडणूक लढवून अशा अनेक पदांवर निवडून आल्यास एक पद वगळता त्यास इतर पदांचा राजीनामा दयावा लागेल व अशारितीने रिक्त झालेल्या पदांची पुन्हा निवडणूक घेणे आवश्यक ठरेल. हे निवडणूक प्रक्रियेच्यादृष्टीने अयोग्य व अडथळा निर्माण करणारे होईल. तसेच अशाप्रकारे काही विशिष्ट वर्गवारीच्या व्यक्तींना निवडणूक प्रक्रियेत इतर वर्गवारीच्या विशेष करुन अराखीव वर्गवारीच्या व्यक्तींपेक्षा अधिक संधी व झुकते माप देणारे असल्याचे राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदर आदेश हे कायम करणे आवश्यकच व योग्यच आहे. मात्र ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्यादृष्टीने अशा उमेदवारास संधी देण्याबाबत सुचविले आहे व त्याकरिता अशा आदेशाच्या अंमलबजावणीच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यास सुचविले आहे. त्याअर्थी, अशी सविस्तर कार्यपध्दती निश्चित करुन देणे आवश्यक झाले आहे. मात्र मा. उच्च न्यायालयाने सुचविल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात एक प्रमुख अडसर हा आहे की उमेदवारास छाननीपूर्वी त्याचे कोणते नामनिर्देशनपत्र तो मागे घेणार आहे असे त्याला विचारले तरी व त्याने तसे मान्य केले तरी छाननीच्या दिवसानंतर उमेदवारी मागे घेण्याचा दिवस असल्याने उमेदवारी मागे घेण्याच्या दिवशी त्याने त्याचे नामनिर्देशनपत्र मागे न घेतल्यास नियमानुसार निवडणूक निर्णय अधिकारी त्याबाबत काहीही करु शकत नाही. अर्थात अशा बाबतीत त्याची दोन किंवा तीन वेगवेगळ्या वर्गवारीकरीता किंवा पदांकरीता सादर केलेली नामनिर्देशनपत्रे वैध ठरल्याने तो अशा दोन किंवा तीन पदांवर निवडणूक लढवू शकतो. अर्थातच, अशा वेळी राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २१/८/२००७ च्या आदेशाची अंमलबजावणी होऊ शकत नाही.

तरीही नैसर्गिक न्यायाच्यादृष्टीने व मा. उच्च न्यायालयाच्या सूचनांच्या अनुषंगाने आयोगाच्या दि. २१/८/२००७ च्या आदेशाची रितसर अंमलबजावणी करण्याकरीता सुटसुटीत व निश्चित कार्यपध्दती विहित करणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगास घटनेच्या अनुच्छेद २४३ के व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १० अ (४) च्या तरतुदीनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करुन मी राज्य निवडणूक आयुक्त खालील प्रमाणे कार्यपध्दती निश्चित करीत आहे.

ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये

१) राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २१/८/२००७ च्या आदेशानुसार कोणत्याही व्यक्तीस एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक वर्गवारीतून (category) तसेच एकापेक्षा अधिक पदांकरीता निवडणूक लढविता येणार नाही.

२) असे असले तरी एखाद्या उमेदवाराने एकाच प्रभागात विशिष्ट कारणास्तव एकापेक्षा अधिक वर्गवारीतून किंवा एकापेक्षा अधिक पदांकरीता नामनिर्देशनपत्रे दाखल केल्यास त्याचे कोणत्या पदाकरीता दाखल केलेले नामनिर्देशनपत्र छाननीच्यावेळी विचारात घ्यावे याबाबत उमेदवाराने लेखी विकल्प द्यावा. सदर विकल्प हा नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे देणे बंधनकारक राहील. त्यानंतर दाखल केलेल्या विकल्पाचा विचार करता येणार नाही.

३) उमेदवाराने वर नमूद केल्याप्रमाणे त्याचे कोणत्या पदाकरीता दाखल केलेले नामनिर्देशनपत्र छाननीच्यावेळी विचारात घ्यावे याचा लेखी विकल्प दिलेल्या मुदतीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर न केल्यास निवडणूक निर्णय अधिकारी छाननीच्यावेळी अशा उमेदवाराचे त्या प्रभागात कालानुक्रमे प्रथम दाखल केलेले नामनिर्देशनपत्र, मग ते कोणत्याही वर्गवारीसाठी, कोणत्याही पदाकरीता असले तरी छाननीकरीता विचारात घेईल व त्याव्यतिरिक्त त्या प्रभागात इतर वर्गवारीकरीता / पदांकरीता

दाखल केलेल्या कोणत्याही नामनिर्देशनपत्राचा छाननीकरीता विचार केला जाणार नाही . अशा इतर वर्गवारीकरीता / पदांकरीता दाखल केलेली सर्व नामनिर्देशनपत्रे अवैध ठरविली जातील.

४) अशा प्रकरणी छाननीच्यावेळी छाननीकरीता विचारात घेतलेले नामनिर्देशनपत्र कोणत्याही कारणासाठी अवैध ठरले तरीही अशा उमेदवाराच्या त्याच प्रभागात इतर कोणत्याही वर्गवारीकरीता / पदांकरीता दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्राचा विचार करता येणार नाही.

५) एका उमेदवारास एका पदाकरीता जास्तीत जास्त चार नामनिर्देशनपत्रे सादर करण्याचा अधिकार आहे. अशाप्रकारे कालानुक्रमे प्रथम दाखल केलेले नामनिर्देशनपत्र ज्या वर्गवारीकरीता / पदाकरीता दाखल केले आहे त्याच पदाकरीता अशी एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे दाखल केली असल्यास ती सर्व नामनिर्देशनपत्रे स्वीकारल्या छाननी करण्यात यतील . मात्र त्या पदाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही पदाकरीता / वर्गवारीकरीता नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास त्याबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

६) आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून पुढे होणाऱ्या सर्व ग्रामपंचायत निवडणूकांमध्ये लागू राहतील.

( नन्द लाल )

राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र